# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ई-निविदा क्र.आस्थापना/सुरक्षा रक्षक/ईटी-१०१-२०२५

कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक पुरवठा करणे बाबत

## ई-निविदा २०२५-२६

## ( कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक पुरवठा करणे बाबत)

कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपूरी, नांदेड, ((१) **प्रस्तुत विद्यापीठाची मुख्य प्रशासकीय इमारत, विविध संकुले, वसतीगृह, विविध इमारती आणि अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने (२) विद्यापीठ उप-परीसर, लातूर आणि (भूकंप मापन केंद्र), किल्लारी (३) न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली (४) कै. उत्तमरावजी राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट ता.किनवट जि.नांदेड (५) विद्यापीठ उपपरिसर, परभणी ता.जि. परभणी)** येथे **सुरक्षा व्यवस्थेसाठी कंत्राटी तत्वावर सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी** ऑनलाईन ई-निविदा मागवित आहेत. या निविदेसंबंधी सर्व सूचना/शुध्दीपत्रक/मुदतवाढ देणे त्यात काही बदल करणे हे प्रस्तुत विद्यापीठाच्या संकेत स्थळावर व महाटेंडर वेबसाईटवर प्रसिध्द केले जाईल वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in व विद्यापीठाचे www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर **दिनांक ३०/०८/२०२५ रोजी पासून दुपारी ४.०० वाजेपासून ते दिनांक २०/०९/२०२५ दुपारी ४.००** वाजेपर्यंत पाहता येईल. सदर निविदा स्विकारणे/नाकारणे हे सर्व अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवले आहेत.

जा.क्र.- आस्था /३/२०२५-२६/सुरक्षा रक्षक पुरवठा/ईटी-१०१-२०२५/१५११
स्थळ:- विष्णुपूरी, नांदेड
दिनांक: १३/०८/२०२५

**प्र.कुलसचिव**

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

<u>प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :</u>

०१. मा.जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर ई-निविदा सूचना
**०१. दैनिक The Hindu**
**०२.दैनिक सामना**
**०३.दैनिक पुंण्यनगरी**
दैनिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही करावी.

०२. सिस्टिम एक्सपर्ट, यांना देऊन कळविण्यात येते की, सदर ई-निविदा सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

०३. सूचना फलक, प्रशासकीय इमारत, प्रस्तुत विद्यापीठ

०४. सूचना फलक, आस्थापना विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपूरी, नांदेड (०१. प्रस्तुत विद्यापीठाची मुख्य प्रशासकिय इमारत, विविध संकूले, वसतीगृह, विविध इमारती आणि अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने ०२. विद्यापीठ उपपरिसर, लातूर आणि (भूकंप मापन केंद्र) किल्लारी ०३. न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली ०४. कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट.ता. किनवट, जि.नांदेड ०५. विद्यापीठ उपपरिसर परभणी, ता.जि. परभणी) येथे सुरक्षा व्यवस्थेसाठी कंत्राटी तत्वावर सुरक्षारक्षक पुरविण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| ०१. | ऑनलाईन निविदा प्रकाशित करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक : २९/०८/२०२५ ठीक दुपारी ४.०० पासून |
| ०२. | ऑनलाईन टेंडर डॉक्यूमेंट डाउनलोड करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक : ३०/०८/२०२५ ठीक दुपारी ०४.०० पासून ते दिनांक : २०/०९/२०२५ ठीक दुपारी ४.०० पर्यंत |
| ०३. | निविदा पुर्व बैठक दिनांक व वेळ | दिनांक : ०८/०९/२०२५ ठीक सकाळी ११.०० वाजता |
| ०४. | ऑनलाईन निविदा दाखल करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक : ३०/०८/२०२५ ठीक दुपारी ०४.०० पासून ते दिनांक: २०/०९/२०२५ ठीक दु.०४.०० पर्यंत |
| ०५. | ऑनलाईन टेक्निकल निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक: २५/०९/२०२५ ठीक दु.१२.०० नंतर शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा नंतर कार्यालयीन दिवशी. |

| अ.क | तपशिल | अनामत रक्कम | टेंडर फॉर्म फी |
|---|---|---|---|
| ०१. | Supply of Security Services (Contractual) | रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) | रु.२०,०००/- (अक्षरी रुपये विस हजार) |

**टीप:-** सर्व पात्र निविदाधरकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी www.mahatenders.gov.in वर रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. निविदाधारकांनी वर दिलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देयके भरणे संदर्भात व डीजीटल सही प्रमाणपत्र व ऑनलाईन निविदा सादर करणे संदर्भात काही तांत्रिक अडचणी असल्यास टोल फ्री क्रमांक महाराष्ट्र शासन ०१२०-४००१-००२/०१२०-४०००१-००५/०१२०-४४९३३९५ तसेच इतर माहितीसाठी विद्यापीठाच्या ०२४६२-२१५२४६ यावर संपर्क साधावा. ई-निविदा सूचना मध्ये बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

**संदर्भ क.**:आस्था/३/२०२५-२६/सुरक्षा रक्षक पुरवठा/ईटी-१०१-२०२५/१५११
**स्थळ**: विष्णुपूरी, नांदेड
**दिनांक** :१३/०८/२०२५

प्र.कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपूरी, नांदेड

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded 431 606

Maharashtra State, India

Established on 17th September 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B)
NAAC Re-accredited 'B++' grade with CGPA 2.96

# :: TENDER DOCUMENT ::

## For Supply of Security Services (Contractual)

(Year - 2025)

**E-Tender No.:** Estt./3/Supply of Security Guard Services (Contractual) /ET-101-2025/1511
**Place:** Vishnupuri, Nanded
**Date:** 13/08/2025

**:: Issuing Authority ::**

**Registrar**
**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded**

:: ई-निविदा सूचना ::

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सुरक्षारक्षक पुरविणेच्या कामाचा तपशील | : | ०१. प्रस्तुत विद्यापीठाची मुख्य प्रशासकिय इमारत, विविध संकूले, वसतीगृह, विविध इमारती आणि अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने<br>०२. विद्यापीठ उपपरिसर, लातूर आणि (भूकंप मापन केंद्र) किल्लारी<br>०३. न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.<br>०४. कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट. ता. किनवट, जि.नांदेड.<br>०५. विद्यापीठ उपपरिसर परभणी,ता.जि.परभणी.<br>वरील ठिकाणी सुरक्षा रक्षक कंत्राटी पध्दतीने पुरवठा करणे बाबत. (सुरक्षा रक्षकांची अंदाजित संख्या: ७५ ते ८०) |
| २) | कामाचा कालावधी | : | एका वर्षासाठी (कार्यादेश मिळाल्याच्या तारखेपासून ०१ वर्षासाठी) |
| ३) | ई-निविदा अर्जाचे शुल्क | : | ई-निविदा अर्ज शुल्क २०,०००/- (वीस हजार रुपये) |
| ४) | वार्षिक अंदाजित खर्च | : | रु. २,००,०००,००/- (दोन कोटी रुपये) |
| ५) | निविदा इसारा रक्कम (EMD) | : | वरील वार्षिक खर्चाच्या १ % (विना व्याज परतावा करण्यात येईल) |
| ६) | सुरक्षा अनामत (Security Deposit) | : | वरील नमूद वार्षिक खर्चाच्या एकूण ५ % इतकी रक्कम यशस्वी झालेल्या निविदाधारकास लेखी सूचना मिळाल्यानंतर कामाचा कार्यादेश घेण्यापूर्वी ०७ दिवसाच्या आत विद्यापीठाच्या लेखा विभागात भरणा करून, भरणा केलेल्या रकमेची एक पावती आस्थापना विभागात जमा करावी लागेल. |
| ७) | | : | निविदा अर्ज शुल्क आणि ईएमडी (EMD) रक्कम ही केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारे शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळा मार्फतच स्वीकारण्यात येईल. |
| ८) | | : | यशस्वी निविदाधारकाने सुरक्षा अनामत रक्कम वरील नमूद मुदतीत भरणा न केल्यास आणि काम न स्वीकारल्यास ते सेवा पुरविण्यास असमर्थ असल्याचे समजले जाईल व त्यानंतर संबंधित निविदाधारकास काळ्या यादीत समाविष्ट करुन विद्यापीठ प्रशासन जो निर्णय घेईल तो निर्णय अंतिम असेल. |
| ९) | | : | काही तांत्रिक अडचणीमुळे कोणतीही ई-निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे तसेच याबाबत कोणतेही कारण न दाखवता ई-निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी राखून ठेवलेला आहे. |
| १०) | | : | सदर कामासाठीच्या ई-निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर केवळ ऑनलाईनच स्वीकारल्या जातील. |
| ११) | | : | निविदाधारकाचे कंपनी/एजन्सीचे नाव, पत्ता, मोबाईल, ई-मेल इ. सर्वच जेथे-जेथे दर्शवणे आवश्यक आहे तेथे तेथे सारखेच असणे आवश्यक आहे. |

सदर कामाचा तपशील /स्वरुप व ई-निविदेच्या अटी, शर्ती इत्यादीची माहिती महाराष्ट्र शासनाच्या www. mahatenders. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्र.कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपूरी, नांदेड

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

तांत्रिक लिफाफा-०१

सदर कामाच्या ई-निविदा पात्रतेसंबंधी खालील अटी-शर्तीची (दस्ताऐवजांची सत्यप्रतीसह) पूर्तता करणे आवश्यक राहील. तसेच खालील सर्व अटी व शर्ती निविदाधारकावर बंधनकारक राहतील. या अटी व शर्तीच्या अधीन राहूनच ई-निविदा स्वीकारल्या जातील.

:: परिशिष्ट-१ ::

## LIST OF DOCUMENTS REQUIRED COMPULSORY ENCLOSED ATTESTED COPIES:

| | |
|---|---|
| a. | EMD receipt copy- (EMD exemption will be granted for MSME/ NSIC/ Udyam) (Attached Government Resolution Copy compulsory) |
| b. | Updated Valid Shop Act License & Activity to link with the Tender Call for Establishment Registration Certificate OR Certificate of Incorporation if Ltd. Company/Partnership Firm |
| c. | Provident Fund Registration Certificate |
| d. | ESIC Registration Certificate |
| e. | GST Registration Certificate and GST Return 3 B copy for the month March -2025 |
| f. | Professional Tax Registration Certificate (PTRC employee) |
| g. | Labour License Registration Certificate (Past Employer) |
| h. | Valid ISO Certificate |
| i. | Last 3 Years IT Returns (Acknowledgement for the Assessment Year 2022-23, 2023-24 & 2024-25), & CA certified financial statement for the year Financial Year 2021-22, 2022-23, 2023-24 with UDIN No. |
| j. | Annual experience for supply or Providing minimum **75** Security Guard or work order for the same of Rs.1.5 Crore to Governement / Semi Government/Educational Institutions/ Industrial Field. |
| k. | Valid Character Certificate from Police Department |
| l. | Valid Solvency Certificate of Rs. 25,00,000/- any Nationalized or Scheduled bank (Issued by bank on or after the date of tender) |
| m. | Turnover Certificate Per year Rs. 3,00,00,000/- for last three Financial years 2021-22, 2022-23, 2023-24 (Certified by CA) |
| n. | Valid Certificate of registration under Private Security Act, 2005 |
| o. | Valid Security Guards Board Exemption letter |
| p. | Self notarized declaration in respect of no cases are pending regarding PF, ESIC,PT & GST against him (परिशिष्ट-२) on Rs.500/- Bond Paper. |
| q. | कोणत्याही शासकीय निमशासकीय कार्यालयाने काळया यादीत समावेश केला नसल्याचे शपथपत्र ५०० रुपयाच्या बॉण्डवर सोबत जोडणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्र (नमुना) |

| r. | अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र (निविदाधारकाच्या लेटर हेड वर) |
|---|---|

टिप: १. उपरोक्त सर्व कागदपत्रे ई-निविदेसोबत जोडणे अनिवार्य आहेत. सदर कागदपत्रे स्वसाक्षांकित करुनच ई-निविदेसोबत सादर करणे, जर उपरोक्त कागदपत्रांपैकी एकही कागदपत्रे नसल्यास ती ई-निविदा अपात्र समजण्यात येईल.

२. निविदाधारकांनी केवळ वरील नमूद कागदपत्रेच सादर करावीत. अनावश्यक कागदपत्रे ई-निविदेसोबत सादर करू नये अनावश्यक कोणतेही कागदपत्रे विचारात घेतले जाणार नाहीत, निविदाधारकाने याची कृपया नोंद घ्यावी.

प्र.कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपूरी, नांदेड

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

## :: परिशिष्ट- २ ::

**टीप :** - ई-निविदेसोबत ५०० रूपयाच्या बॉण्ड पेपरवर नोटरीसह खालील मुद्यांचा समावेश असलेले शपथपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

| | |
|---|---|
| ०१. | निविदाधारकाचे इतर शासकीय, निमशासकीय कार्यालयात/क्षेत्रात कंत्राटी सुरक्षारक्षक यांचे भविष्य निर्वाह निधी ई. एस. आय. सी., जीसएसटी व व्यवसाय कर इ. बाबतीत कुठल्याही प्रकारचे प्रकरणे प्रलंबित किंवा न्यायप्रविष्ट नाही. |
| ०२. | ज्या निविदाधारकाची कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठीच्या कामासाठी निवड होईल त्यांचेमार्फत विद्यापीठास पुरविण्यात येणा-या सुरक्षा रक्षकांना कर्तव्यावर असताना जर कुठल्याही प्रकारचा अपघात, शारीरिक नुकसान झाल्यास त्याचा वैद्यकीय खर्च व इतर अपघात नुकसानभरपाई संबंधित सुरक्षारक्षकास देणे कंत्राटदार यांच्यावर बंधनकारक राहील. |
| ०३. | कंत्राटदारामार्फत विद्यापीठास पुरविलेल्या सर्व सुरक्षारक्षकांवर देखरेख करण्यासाठी व त्यांच्याकडून सुरक्षेची कामे जबाबदारीने करून घेण्यासाठी, वेळोवेळी कामात येणा-या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी ०१ क्षेत्रिय अधिकारी, ०३ सुपरवायझर (तीन पाळीत २४ तासांकरीता) एजन्सीमार्फत नेमणे बंधनकारक राहील. सदर क्षत्रिय अधिकारी व ०३ सुपरवायझर यांच्याकडे स्व:ताचे दुचाकी वाहन आवश्यक आहे. सदर ०३ सुपरवायझर पैकी किमान ०२ सुपरवायझर हे माजी सैनिक असणे आवश्यक आहे. सुपरव्हिजनची जबाबदारी कंत्राट मिळालेल्या कंत्राटदार एजन्सीची असल्यामुळे क्षेत्रीय अधिकारी, सुपरवायझर यांचे वेतन कंत्राटदार यांनीच अदा करावयाचे आहे, विद्यापीठ अदा करणार नाही. याची नोंद निविदाधारकाने घ्यावी. |
| ०४. | किमान वेतन कायद्यानुसार सुरक्षारक्षकांचे वेतन अदा करणे कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील. सुरक्षारक्षकांचे पी.एफ, ई. एस. आय. सी., एल. डब्ल्यू एफ, व्यवसाय कर भरणा करणे बंधनकारक राहील. शासनाने सुरक्षारक्षकांचे वेळोवेळी लागू केल्याप्रमाणे सुधारित विशेष भत्ता देणे बंधनकारक राहील. |
| ०५. | विद्यापीठाकडून देयक पारीत होण्याची वाट न पाहता, प्रत्येक महिन्याच्या ०७ तारखेच्या आत सुरक्षारक्षकांचे वेतन कंत्राटदार/एजन्सीने अदा करणे बंधनकारक राहील. |
| ०६. | करारातील कंत्राट कालावधी संपेपर्यंत कंत्राट मध्येच सोडता येणार नाही कंत्राटदार/एजन्सीने मध्येच कंत्राट सोडल्यास तीन (०३) महिन्याची देयकाची रक्कम विद्यापीठास दंडाच्या स्वरुपात जमा केली जाईल. |

प्र.कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपूरी, नांदेड

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

:: परिशिष्ट-३ ::

**सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी ई-निविदेच्या अटी व शर्ती:-**

| | |
|---|---|
| ०१) | तांत्रिक लिफाफा -०१ मधील परिशिष्ट ०१ अन्वये ई-निविदेतील अटी व शर्तीनुसार सर्व कागदपत्रांची पूर्तता करणे अनिवार्य आहे तसेच वित्तिय लिफाफा ०२ मध्ये वित्तिय विवरण द्यावयाचे आहे<br><br>**विशेष टीप:** जे निविदाधारक तांत्रिक लिफाफा क्र. ०१ मध्ये पात्र ठरतील, त्याच निविदाधारकाचा वित्तीय लिफाफा क्र.०२ (सुरक्षा रक्षकांसाठी दर) उघडण्यात येईल. वित्तीय लिफाफ्यातील अ.क्र.१.०१ व १.०२ चे एकत्रित न्युनतम काढण्यात येईल. |
| ०२) | निविदाधारकांनी तांत्रिक लिफाफा क्र.०१ परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या सर्व कागदपत्राच्या स्वसाक्षांकित प्रति ई-निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय ई-निविदा ग्राहय समजली जाणार नाही. |
| ०३) | ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होणा-या निविदाधारकास कोणत्याही शासकिय/निमशासकिय क्षेत्रात कमीत कमी ७५ सुरक्षा रक्षक पुरवित असल्याचा अनुभव प्रमाणपत्र व कार्यादेश प्रत सादर करणे बंधनकारक राहील आणि वार्षिक वर्क ऑर्डर (सुरक्षा पुरवठा) रु.१.५ कोटीचे सादर करणे आवश्यक आहे. ज्यात सुरक्षा रक्षक पुरविल्याचा स्पष्ट उल्लेख असावा. |
| ०४) | निविदाधारकाकडून विद्यापीठास पुरविण्यात येणारे सर्व सुरक्षा रक्षक उत्तम प्रशिक्षित व अनुभवी असावेत. पुरविण्यात येणा-या सुरक्षा रक्षकांकरिता उत्तम प्रशिक्षक व अनुभवी अधिकारी व दुसरी बाह्य यंत्रणा सुरक्षा रक्षकांच्या देखरेख आणि प्रशिक्षणासाठी असणे आवश्यक आहे. सुरक्षा रक्षकांना सुरक्षाबाबतचे दर महिन्याला प्रशिक्षण वर्ग आयोजित करून, त्याबाबतचा अहवाल विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी मार्फत आस्थापना विभागास सादर करावा लागेल. |
| ०५) | निविदाधारक यांनी ई-निविदेसोबत सादर केलेले विहित प्रमाणपत्र/नोंदणी केलेले विहीत परवाने/अनुभव प्रमाणपत्रे/विविध कर भरणा पावत्या तथा इतर सर्व कागदपत्रे इ. विद्यापीठाने पडताळणीसाठी गठित केलेल्या समितीसमोर मूळ कागदपत्रांसह समितीने बोलविल्यास हजर रहावे लागेल. |
| ०६) | ज्या निविदाधारकास सदरचे काम मिळाल्यानंतर त्यांनी सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रावर इतर कुणाचाही आक्षेप आल्यास समितीने पुन:श्च सत्य पडताळणी केल्यास व दोषी आढळल्यास निवड झालेल्या निविदाधारकाला रितसर नोटीस देऊन त्यांच्यासोबत झालेला वार्षिक करार संपुष्टात आणण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून संबंधित निविदाधारकाचा काळ्या यादीत समावेश करण्यात येईल. |
| ०७) | यशस्वी निविदाधारकास कार्यादेश घेण्यापूर्वी लेखी सूचना मिळाल्यानंतर ०७ दिवसाच्या आत सुरक्षा अनामत रक्कम विद्यापिठाच्या लेखा विभागात भरणा करावी लागेल व सदर सुरक्षा अनामत रक्कम कंत्राट संपल्यानंतर स्थावर, लेखा, आस्थापना व सुरक्षा विभाग प्रमुखांकडून ना-हरकत प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच बिना व्याज परत करण्यात येईल. |
| ०८) | कंत्राटदाराने सुरक्षा रक्षकाची नेमणूक करतांना कुठल्याही परिस्थितीत १८ वर्षापेक्षा कमी आणि ५८ वर्षापेक्षा जास्त वय असलेले सुरक्षा रक्षक नेमू नयेत.<br>तसेच सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करतांना विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी यांच्या निगराणीखाली शारीरिक चाचणी करूनच नियुक्ती करावी. नेमणूक केलेला एखादा सुरक्षा रक्षक वाईट प्रवृत्तीचा असल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले तर तो सुरक्षा रक्षक त्वरीत बदलून दुसरा सुरक्षा रक्षक त्वरीत पुरवठा करणे आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| ०९) | विद्यापीठाचे मुख्य प्रवेशद्वार, विद्यापीठ परिसरातील स्वामी रामानंद तीर्थ यांचा पुर्णाकृती पुतळयाचे संरक्षण करणे ही विशेष बाब म्हणून कंत्राटदाराची जबाबदारी राहोल आणि विद्यापीठाच्या परिसरात होणा-या दैनंदिन कामकाज व निरनिराळ्या कार्यक्रमांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने निविदाधारकाने उपलब्ध सुरक्षा रक्षकांपैकी व्हिजीलन्स स्कॉड असणे अनिवार्य आहे. |
| १०) | विद्यापीठास.पुरविलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांना पोलिस विभागाने निर्गमित केलेले नजीकच्या काळातील किमान ३ महिन्याच्या आतील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र विद्यापीठास सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल. |
| ११) | कंत्राटदाराने स्वखर्चाने प्रत्येक सुरक्षा रक्षकास एक काठी, दर्जेदार कंपनीची टॉर्च, ओळख पत्र, गणवेश, शिटी उपलब्ध करून देणे अनिवार्य राहील. यशस्वी निविदाधारकास सुरक्षा रक्षकांना पुरविण्यात येणारी साहित्य जसे वॉकी टॉकी, बायोमॅट्रिक मशिन, काठी, टॉर्च, गणवेश, शिटी इ. साहित्य १५ दिवसाच्या आत करार करतेवेळेस प्रस्तुत विद्यापीठाच्या सुरक्षा पर्यवेक्षक यांना दाखवावे लागेल. सदर साहित्य उपलब्ध असल्याची खातरजमा झाल्यानंतर यशस्वी निविदाधारकास कार्यआदेश निर्गमित करण्यात येईल. |
| १२) | कंत्रादारामार्फत विद्यापीठास पुरविलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांना विद्यापीठाच्या संपूर्ण चल अचल मालमत्तेची संरक्षणाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडावी लागेल. ज्यात विद्यापीठाच्या भूभागाचे संरक्षण, ईमारतीचे संरक्षण, कार्यालयातील सर्व अचल मालमत्ता, विविध प्रयोगशाळांमधील महागड्या यंत्र सामग्री यांच्या संरक्षणाची जबाबदारी समाविष्ट असेल तसेच विशेष बाब म्हणून विद्यापीठ परिसरात मोकाट जनावरांना (उदा. वानर, माकड, गाय., म्हैस, कुत्रे, वराह) व इतर जनावरांना फिरण्यास प्रतिबंधित करण्याची जबाबदारी कंत्राटदार यांनी पुरविलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांची राहील. |
| १३) | कंत्राटदार ज्या सुरक्षा रक्षकांची विद्यापीठात कर्तव्यासाठी नियुक्ती करेल ती नियुक्ती शासनाच्या प्रचलित किमान वेतन कायद्याप्रमाणे करेल. तसेच त्यांना EPF, ESIC शासनाच्या नियमाप्रमाणे करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. पुढील महिन्याच्या देयकासोबत चालान जोडणे बंधनकारक राहील. सुरक्षा रक्षकांना देण्यात येणारे मासिक वेतन व नियुक्तीच्या अटी व शर्ती त्यास मान्य असल्याबाबतचे संमती पत्र/करारपत्र करुन घ्यावे व सदर सुरक्षा रक्षक विद्यापीठाच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगणार नाही अथवा विद्यापीठाविरुध्द कोणत्याही प्राधिकरणापुढे अथवा न्यायालयात दाद मागणार नाही, असा स्पष्ट उल्लेख संमतीपत्र/करारपत्रात करण्याची जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील. |
| १४) | कंत्राटदाराने विद्यापीठास पुरविलेल्या सुरक्षा रक्षकांच्या देखरेखीकरिता स्वत:च्या अखत्यारीत सुपरवायझर /क्षेत्रीय अधिकारी नेमणे बंधनकारक राहील. क्षेत्रीय अधिकारी/सुपरवायझर यांचे कोणतेहो देयक अथवा भत्ते विद्यापीठ कंत्राटदाराला अदा करणार नाही. कंत्राटदारास स्वखर्चाने सुरक्षा रक्षकास अद्यावत तंत्रज्ञान असलेली वॉकी-टॉकी यंत्रणा उपलब्ध करून देणे बंधनकारक राहिल व सदर यंत्रणेची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ही सदर सुरक्षा एजन्सीची असेल. |
| १५) | <u>सुरक्षा रक्षकांच्या वेतन देयकाबाबत :-</u> कंत्राटदार यांनी विद्यापीठास पुरविलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांची हजेरी कंत्राटदार यांच्या बायोमॅट्रिक मशीनवर घेणे बंधनकारक राहील. बायोमॅट्रिक हजेरीची गणना करूनच कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येईल. बायोमेट्रिक मशीन संबंधित कंत्राटदार यांनीच त्यांच्या स्वखर्चाने विद्यापीठाने निश्चित केलेल्या ठिकाणी बसवावे व सदर यंत्राचे देखरेखही कंत्राटदार यांनीच करणे बंधनकारक राहील यासाठी विद्यापीठ कोणत्याही खर्चाची रक्कम कंत्राटदार यांना अदा करणार नाही. सुरक्षा रक्षकांचे येताना व जातांनाची बायोमेट्रिक हजेरी मासिक देयकासोबत देणे बंधनकारक राहिल. सुरक्षा रक्षकाची ज्या दिवशीची येतांना किवा जातांनाची हजेरी नसेल त्या दिवसाचे वेतन कंत्राटदाराच्या देयकातून कपात करण्यात येईल तसेच महिन्यातून तीन वेळेस उशीराने येतांनाची हजेरी निदर्शनास आल्यास त्या सुरक्षा रक्षकाचे त्या महिन्यातील एक दिवसाचे वेतन कपात करून हजेरी नमुद करावी.<br>कंत्राटदाराच्या वतीने विद्यापीठास पुरविलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांना दरमहा अदा करण्यात येणा-या मासिक वेतनाचे पगारपत्रकावर संबंधीत सुरक्षा रक्षकांची स्वाक्षरी घेऊन त्याची पोहोच या कार्यालयास सादर करणे कंत्राटदार यांच्यावर बंधनकारक राहिल. तसेच दर महिन्याच्या शेवटच्या तारखेस नोंदवलेली बायोमॅट्रिक हजेरी ही सुरक्षा अधिकारी अथवा आस्थापना विभाग प्रमुखांच्या समक्ष डाऊनलोड कराव्यात व डाऊनलोड केलेल्या बायोमेट्रिकचे रेकॉर्ड (ऑनलाईन व हार्डकॉपी) दरमहा एक प्रत देयकासोबत विद्यापीठास उपलब्ध |

| | |
|---|---|
| | करुन देण्यात यावे.<br>(कंत्राटदाराने विद्यापीठास पुरविलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांची बायोमॅट्रिक हजेरी घेणे बंधनकारक आहे. तसेच दैनंदिन हजेरी पट विद्यापीठाच्या सुरक्षा पर्यवेक्षकामार्फत तपासून घेणे बंधनकारक राहील. परंतु कोविड/संसर्गजन्य विषाणू फैलवणारे आजार प्रादुर्भाव कालावधीमध्ये शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कर्मचा-यांची दैनंदिन बायोमेट्रिक हजेरी घेण्यास स्थगिती देण्यात येईल करिता सुरक्षा रक्षकांची दैनंदिन हजेरी रेटिना डिटेक्टर किंवा फेस डिटेक्टर यंत्रणेवर घेऊन त्याचा अहवाल विद्यापीठास सादर करणे बंधनकारक राहील) |
| १६) | कंत्राटदार यांनी सुरक्षा रक्षक पुरविणेच्या कामाचे **मासिक देयक हे आवश्यक प्रक्रियांची पूर्तता करुन २ प्रतित प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत विद्यापीठाच्या सुरक्षा विभागात सादर करावे.** अपूर्ण असलेले देयक स्विकारले जाणार नाही. विनात्रुटी देयक सादर केल्याच्या दिनांकापासुन पुढील १५ दिवसात सदरील देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल. कंत्राटदार यांनी सादर केलेले देयके विद्यापीठाकडून अदा करण्यास कोणत्याही तांत्रिक अथवा इतर कारणास्तव उशीर झाल्यास त्या कारणास्तव कंत्राटदार त्यांच्या सुरक्षा रक्षकांचे मासिक वेतन थांबवणार नाही. कंत्राटदारास सर्व सुरक्षा रक्षकांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ०७ तारखेच्या आत त्यांच्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य राहील व सुरक्षा रक्षकांचे वेतन केल्याचे बँक स्टेटमेंट, पी एफ, ई. एस. आय सी चे चालान आणि जीएसटी भरल्याचा पुरावा पुढील महिन्याच्या देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील. जर १० तारखेच्या पुढे वेतन गेले तर पुरवठा धारकास प्रतिदिवस रु.१०००/-(अक्षरी रुपये एक हजार) दंड आकारण्यात येईल, सदर दंड आकारण्याचा अधिकार विद्यापीठ प्रशासनास राहील. |
| १७) | निविदाधारकास निरनिराळया कायद्यातील तरतुदीप्रमाणे अभिलेख जतन करुन ठेवावे लागेल विद्यापीठाने ते मागीतल्यास तात्काळ सादर करावे लागेल. |
| १८) | कंत्राटदार यांच्या मासिक देयकाची अदायगी करतांना शासनाच्या नियमाप्रमाणे उत्पन्न कराची कपात (TDS) आणि वस्तू व सेवा कराची कपात (GST TDS) देयकातून परस्पर करण्यात येईल व शासन खाती जमा करण्यात येईल. |
| १९) | कंत्राटदाराने विद्यापीठास पुरविलेले सुरक्षा रक्षक, सुपरवायझर, क्षेत्रीय अधिकारी यांना दैनंदिन कामकाजा दरम्यान विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी व आस्थापना विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. |
| २०) | सुरक्षा रक्षकाच्या हलगर्जीपणाने विद्यापीठातील कोणत्याही विभागातील चोरी झाल्यास नुकसान भरपाई कंत्राटदाराकडून वसुल केल्याशिवाय कंत्राटदाराला ना-हरकत प्रमाणपत्र विभाग प्रमुखांनी संबंधीत कंत्राटदारास देऊ नये. परंतु कंत्राटदाराने नुकसान भरपाई विभाग प्रमुखांना करुन दिल्यास विभाग प्रमुखांनी कंत्राटदारास दिलेल्या नाहकरत प्रमाणपत्राची एक प्रत आस्थापना विभागास सादर करावे. तसेच चोरी प्रकरणी एखाद्यावेळेस पोलिस स्टेशनमध्ये एफ आय आर दाखल करावयाची गरज पडल्यास त्या-त्या विभाग प्रमुखांनी संबंधीत चोरी अथवा नुकसानीचे एफ आय आर कुलसचिवांमार्फत पोलिस स्टेशनमध्ये करावे. ज्या विभागामध्ये चोरी अथवा आर्थिक नुकसानाची भरपाई कंत्राटदार यांच्या पुढील मासिक देयकातून कपात करुन घेतली जाईल. याची नोंद निविदाधारक यांनी घ्यावी. |
| २१) | व्यवसाय कर व इतर सर्व कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराचीच असेल व तसेच हमीपत्र कंत्राट मिळाल्यानंतर द्यावे लागेल. |
| २२) | ऑनलाईन प्राप्त होणा-या कोणत्याही ई-निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा तथा यथा-योग्य निर्णय घेण्याचा सर्वस्वी अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे. |
| २३) | ई-निविदा भरणा करण्यासंबंधीची महत्त्वाची सूचना:- ज्या निविदाधारकांना इसारा रक्कम (EMD) शासन निर्णयानुसार भरण्याबाबत सूट असेल तर त्यांनी बयाना रक्कम भरणे आवश्यक नाही. तथापि, त्यांनी तांत्रिक निविदेसोबत (लिफाफा क्र.०१) संबंधीत शासन निर्णय/शासकिय परिपत्रकाची प्रत ई-निविदेसोबत सादर करणे अनिवार्य राहिल. |
| २४) | कंत्राटदार/एजन्सी यांनी नेमणूक केलेल्या कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या शासन नियमाप्रमाणे मागील महिन्याच्या वेतनातील पी. एफ., ई.एस.आय.सी. संबंधित प्राधिकरणाकडून भरणा केलेला तपशिल व विविध करांची पावती एजन्सीच्या पुढील महिन्याच्या देयकसोबत सादर कराव्या लागतील. त्यात कसूर झाल्यास त्यांचे चालू महिन्याचे |

| | |
|---|---|
| | देयक अदा केले जाणार नाही. |
| २५) | विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी व विद्यापीठातील प्राधिकरणाने ठरवून दिल्याप्रमाणे वेळोवेळी केलेल्या सूचनेप्रमाणे विद्यापीठ परिसरातील सुरक्षाचे सर्व कामे सुरक्षा रक्षक सुरक्षा कर्मचा-यांकडून करुन घेण्याची जबाबदारी कंत्राटदार/एजन्सी यांनी विद्यापीठातील सुरक्षेच्या कामासाठी नेमणूक केलेल्या क्षेत्रिय अधिकारी आणि तीन पाळीतील नेमणूक केलेले सुपर वायझर यांचे असून ते त्यांचे प्रथम कर्तव्य राहिल त्यांची कामगिरी समाधान कारक नसल्यास त्यांच्या ऐवजी बदलून दुसरे क्षेत्रिय अधिकारी व सुपर वायझर पुरवावे लागतील. |
| २६) | विद्यापीठ आणि कंत्राटदार/एजन्सी यांचेसोबत झालेला करार हा केवळ संबंधित कंत्राटदारापर्यंतच मर्यादीत राहिल. कराराच्या अनुषंगाने कंत्राटदाराच्या मार्फत विद्यापीठास पुरविलेल्या क्षेत्रिय अधिकारी, सुपर वायझर आणि सुरक्षा रक्षकांचा विद्यापीठाशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कोणताही संबंध राहणार नाही. यासंदर्भात नेमणूक केलेल्या सुरक्षा रक्षकांचे शपथपत्र घेणे कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहिल. |

प्र.कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपूरी, नांदेड

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

:: परिशिष्ट-४ ::

अ) नियमावली :

| | |
|---|---|
| १) | एखादा सुरक्षा रक्षक विद्यापीठात काम करतांना काही गैरवर्तन/नशापाणी केल्याचे निदर्शनास आल्यास अथवा विद्यापीठाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने कुठल्याही प्रकारचे असभ्य वर्तन केल्याचे तपासाअंती निदर्शनास आल्यास त्याबाबत विद्यापीठाने कंत्राटदारास कळविल्यास सदर सुरक्षा रक्षक तात्काळ कामावरुन कमी करून त्या ठिकाणी दुसरा सुरक्षा रक्षक त्वरित पुरवठा करणे आवश्यक राहिल. सुरक्षारक्षक कामावरुन कमी करणे किंवा कामावर ठेवणे ही बाब पूर्णपणे संबंधित कंत्राटदार यांच्या आखत्यारितीत राहिल. |
| २) | कंत्राटदाराने सुरक्षा रक्षक नेमतांना त्याच्या पात्रते विषयी व अनुभवा संबंधी योग्य ती KYC तपासणी करूनच नियुक्ती करावी व सदर सुरक्षा रक्षक गुन्हेगारी प्रवृत्तीचा/पार्श्वभुमीचा नसल्याची खात्री संबंधीत पोलीस स्टेशनकडून करुन नियुक्ती करावी. त्याचे चारित्र्य पडताळणी प्रमाण पत्र विद्यापीठास सादर करावे लागतील. |
| ३) | सुरक्षा रक्षक आणि सुपरवायझर, पर्यवेक्षक यांना विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने कुलसचिव व आस्थापना विभाग आणि सुरक्षा अधिकारी अथवा त्यांचे वरीष्ठ यांनी दिलेले सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. |
| ४) | कंत्रादारामार्फत विद्यापीठास पुरविलेल्या सुरक्षा रक्षकांना विद्यापीठाच्या संपूर्ण चल-अचल मालमत्तेच्या संरक्षणाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडावी लागेल. ज्यात विद्यापीठाच्या भूभागाचे संरक्षण, ईमारतीचे संरक्षण, कार्यालयातील सर्व मालमत्ता, विविध प्रयोगशाळांमधील महागड्या यंत्र सामग्री यांच्या संरक्षणाची जबाबदारी समाविष्ट असेल तसेच विशेष बाब म्हणून विद्यापीठ परिसरात मोकाट जनावरांना (उदा गाय, म्हेस, कुत्रे, वराह) व इतर जनावरांना फिरण्यास प्रतिबंधित करण्याची जबाबदारी कंत्राटदार यांनी पुरविलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांची राहील. |
| ५) | विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी व विद्यापीठात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांना सुरक्षा प्रदान करणे सुरक्षा यंत्रणेची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. |
| ६) | परिसरात बाहेरील येणा-या जाणा-या प्रत्येक व्यक्तीवर नजर ठेवणे तथा आवश्यकता असल्यास सुरक्षेच्या दृष्टीने त्यांची विचारपुस करून ओळख पटवून घेणे. |
| ७) | विद्यापीठ परिसरातील वसतीगृहे, इमारती व शैक्षणिक विभाग व प्रमुख रस्ते, उद्याने येथे बाहेरील व्यक्तीस छायाचित्र काढणे व चित्रीकरण करण्यास मनाई आहे या अनुषंगाने बाहेरील कोणत्याही व्यक्तीस परिसरात छायाचित्र व चित्रीकरण करणार नाही याची दक्षता घेणे वेळप्रसंगी आवश्यकता वाटल्यास दंडात्मक कार्यवाहो करणे. |
| ८) | विद्यापीठ परिसरात वाहन शिकण्यास बंदी आहे. करिता परिसरात बाहेरील व्यक्तीना वाहन शिकण्यास मनाई करणे. वेळप्रसंगी आवश्यकता वाटल्यास दंडात्मक कार्यवाही करणे. |
| ९) | सुरक्षा रक्षकांनी कर्तव्यावर पूर्णतः गणवेशावर हजर राहणे. |
| १०) | कर्तव्यावर असताना कोणत्याही कारणाने कर्तव्यस्थान सोडून इतर ठिकाणी न जाणे. |
| ११) | डयुटीवर वेळेच्या आत येणे आणि ड्युटीची वेळ संपण्याआधी किंवा नंतर बदली सुरक्षा रक्षक येईपर्यंत कर्तव्य स्थान न सोडणे. |
| १२) | परिसरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांचे २४ तास संरक्षण करणे व कोणत्याही परिस्थितीत सदर पुतळ्यांचा अनादर होणार नाही यासाठी खबरदारी घेणे. |
| १३) | विद्यापीठ परिसरातील सर्व विहीरी, जलसाठे आणि तलाव याचे संरक्षण करून येथे पोहण्यास सक्त मनाई असल्याने याबाबत विशेष दक्षता घेणे. तसेच विद्यापीठ पसिरात कोणीही पंतग उडवू नये याची दक्षता घ्यावी. |
| १४) | परिसरात सर्व विहिरीवर लावलेल्या विद्युत मोटारी, परिसरातील प्रमुख रस्त्यावर लावलेल्या सोलार स्ट्रीट लाईटचो बॅटरी, सर्व इलेक्ट्रीक साहित्य, इत्यादींचे चोरापासून संरक्षण करणे. |
| १५) | विद्यापीठात वेळोवेळी होणारे मोर्चे/आंदोलन, धरणे, उपोषणे याबाबतीत विद्यापीठ प्रशासनास सुरक्षा प्रदान |

| | |
|---|---|
| | करणे. |
| १६) | विद्यापीठात कुठल्याही प्रकारचे गैर प्रकार घडणार नाही हो विशेष बाब म्हणून कंत्राटदाराने याबाबत दक्षता घेणे. |
| १७) | विद्यापीठाच्या मालकी हक्काच्या कोणत्याही जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही व परिसरात विनापरवानगी बॅनर/पोस्टर्स लावू देऊ नये. करीता विशेष बाब म्हणून कंत्राटदाराने याबाबत दक्षता घेणे. |
| १८) | सुरक्षा रक्षकांना सुरक्षेच्या कामाबाबत अधिकाधिक नविन बाबींची माहिती होण्यासाठी दर महिन्याला एकदा प्रशिक्षण वर्ग एजन्सीने आयोजित करावे. |
| १९) | सुरक्षा रक्षकास देण्यात येणारे वेतन व नियुक्तीच्या अटी व शर्ती त्यास मान्य असल्याबाबतचे संमती पत्र किंवा करारपत्र करून घ्यावे व कंत्राटदाराने पुरविलेला कोणताही सुरक्षा रक्षक विद्यापीठाच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगणार नाही अथवा विद्यापीठा विरुध्द कोणत्याही प्राधिका-यापुढे अथवा न्यायालयात दाद मागणार नाही असा स्पष्ट उल्लेख संमतीपत्र किंवा करारपत्रात करून घेणे अनिवार्य राहिल. |
| २०) | कंत्राटदाराने सुरक्षेच्या कामासाठी नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांना शासनाच्या प्रचलित किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतनाची रक्कम आवश्यक ती EPF, ESIC इत्यादी कपात करून धनादेशाद्वारे/बँक खात्यामार्फत वेतन करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहिल व त्या बाबतचा दरमहा पुरावा (बँक खाते उतारा) पुढील महिन्याच्या मासिक देयकासोबत सादर करावा लागेल तसेच सुरक्षा रक्षकांचे वेतन कार्यरत विद्यापीठाच्या ठिकाणी सध्या लागू असलेल्या किमान वेतन दरानुसार अदा केले असल्याचे हमीपत्र दर ६ महिन्यांने रू ५००/- च्या स्टॅप पेपरवर नोटरी करून देयकासोबत जोडणे बंधनकारक राहिल व तसा पुरावा सादर केल्यानंतरच चालु महिन्याचे देयक अदा केले जाईल. कंत्राटदार अंतर्गत कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना सेवेच्या बाबतीत किमान वेतनाच्या व इतर सर्व बाबतची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. **सुरक्षा रक्षकांना साप्ताहिक सुटट्रीचे वेतन संबंधित कंत्राटदारातर्फे देय राहील.** |
| २१) | यशस्वी निविदा धारकाने समाधानकारक पध्दतीने कंत्राट कालावधी पूर्ण केल्यानंतर विद्यापीठासाठी नविन एजन्सी नियुक्त होईपर्यंत निविदेतील अटी व शर्ती कायम ठेवून मान्य दरानेच विद्यापीठास सुरक्षा सेवा पुरविणे बंधनकारक राहिल. |

**<u>ब) कामाची वेळ आणि पर्यवेक्षण:-</u>**

| | |
|---|---|
| १) | विद्यापीठातील सर्व प्रशासकीय, शैक्षणिक विभाग व विद्यापीठाच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी दिवसातून (२४) तासाच्या पाळीत) ०३ पाळीमध्ये सुरक्षा रक्षक पुरवावे लागतील प्रथम पाळी (सकाळी ०८.०० ते ते सायं.०४.००) द्वितीय पाळी (सायं ०४.०० ते रात्री १२.००) तृतीय पाळी (रात्री १२.०० ते सकाळी ०८.००) या वेळेत असेल प्रत्येक पाळीत सुरक्षा रक्षकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक किंवा त्या अधिक सुपरवायझर व पर्यवेक्षक पुरवावे लागतील. सुरक्षा रक्षकाच्या सुटट्री दिवशी इतर सुरक्षा रक्षक पुरविण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असेल. |
| २) | सुरक्षा रक्षकाने कुठल्याही प्रकारची गैरवर्तणूक केल्यास किवा कर्तव्यात कसूर केल्यास आणि त्यामुळे विद्यापीठाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्या बाबत विद्यापीठ वेळोवेळी दंड आकारणी बाबत जो निर्णय घेईल तो कंत्राटदारावर बंधनकारक राहिल. |
| ३) | सुरक्षा रक्षकास नेमून दिलेला विभाग किवा सुरक्षा पॉईंट सोडून गेल्यास किवा इतर ठिकाणी किवा विद्यापीठ परिसराच्या बाहेर वारवार आढळून आल्यास संबंधित सुरक्षा रक्षकांस १००/- रुपये दंड आकारण्यात येईल दंडाची रक्कम एजन्सीच्या मासिक देयकातून कपात करण्यात येईल. |
| ४) | कंत्राटदार/एजन्सी सुरक्षा रक्षकास नेमून दिलेल्या विभागात किवा सुरक्षा पॉइंटवर ज्यादिवशी कर्तव्य न बजावल्यास किंवा सेवा समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकारी यांनी तक्रार केल्यास किवा सुरक्षा अधिकारी यांच्या पाहणी दरम्यान निदर्शनास आल्यास त्या सुरक्षा रक्षकाचे ०१ दिवसाचे वेतन कंत्राटदार /एजन्सी यांच्या मासिक देयकातून कपात करण्यात येईल. |

क) कामगार कायद्याचे पालन :-

| | |
|---|---|
| १) | कंत्राटदाराने विद्यापीठात संरक्षणाच्या कामासाठी कोणताही सुरक्षा रक्षक नियुक्त करताना बाल कामगार, शारीरिक , मानसिक दृष्टयाअपंग व व्यसनी व्यक्तीस नेमणूक करू नये. |
| २) | कंत्राटदार ज्या सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करेल ती नियुक्ती शासनाच्या प्रचलित किमान वेतन कायद्याप्रमणे करेल तसेच त्यांना EPF, ESIC शासनाच्या नियमाप्रमाणे देईल कंत्राटदार यांनी पुरविलेल्या सुरक्षा रक्षकांचे PF, ESIC शासन नियमाप्रमाणे भरणे बंधनकारक असेल. |
| ३) | कामगार कायद्यानुसार आवश्यक त्या सुविधा व सुरक्षा साधन सामग्री पुरविणे ही कंत्राटदाराची जबाबदारी राहील. |
| ४) | कंत्राटदारास लेबर ॲक्ट, वर्कमन कम्पनसेशन ॲक्ट पेमेन्ट ऑफ वेजेस ॲक्ट, इएसआयसी अंक्ट, पीएफ ॲक्ट, प्रोफेशनल टॅक्स व शासनाच्या इतर नियमाप्रमाणे व पुढे वेळोवेळी निर्गमित केल्याप्रमाणे त्यातील अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील. |
| ५) | कंत्राटदाराने सुरक्षा रक्षक सेवा पुरविण्याच्या कंत्राटासंबंधी व सुरक्षा रक्षकांसंबंधी शासनाच्या नियमानुसार आवश्यक ते सर्व रजिस्टर, इतर नोंदी नियमित ठेवाव्या लागतील. त्यासाठी लागणारी सर्व लेखनसामग्री कंत्राटदाराने स्वखर्चाने उपलब्ध करून घ्यावयाची आहे. विद्यापीठाने किंवा शासनाने वेळोवेळी मागणी केल्यास सदरची माहिती, रजिस्टर व इतर नोंदी कंत्राटदाराने विद्यापीठास किंवा शासनास त्वरीत उपलब्ध करून द्यावा लागतील. |

ड) विमा व नुकसान भरपाई :-

| | |
|---|---|
| १) | सुरक्षा रक्षकांना काम करतांना काही दुखापत व अपघात झाल्यास त्याचे वैद्यकीय खर्चाची नुकसान भरपाई देणे बाबत तसेच कोणत्याही संबंधीत कायद्यामधील तरतुदीनुसार अथवा न्यायालयाच्या आदेशानुसार कोणतीही जबाबदारी निश्चित केल्यास त्या बाबत कंत्राटदाराची सर्वस्वी जबाबदारी राहिल. कंत्राटदाराकडील सर्व सुरक्षा रक्षकांच्या संरक्षणाची जबाबदारी ही कंत्राटदाराचीच राहिल. तसेच एखाद्या घटनेबाबत आवश्यकता असल्यास पोलीस स्थानकात सूचना देणे अथवा गुन्हा दाखल करण्याची जबाबदारी ही संपूर्णपणे कंत्राटदाराचीच राहिल. |
| २) | कंत्राटी कामाच्या कालावधीत सुरक्षा रक्षकांचा विमा उतरविणे अनिवार्य आहे. |
| ३) | सुरक्षा रक्षकांच्या आरोग्यविषयक तपासणी कंत्राट सुरू झाल्यानंतर दर तिमाही करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहिल व तपासणी अंती आवश्यकतेप्रमाणे आरोग्याची काळजी घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची व सदर सुरक्षा रक्षकांची राहिल. |

इ) वाद-विवाद निवारण कामी (Dispute Resolution) :-

| | |
|---|---|
| १) | सुरक्षा रक्षकास दिलेले काम व इतर अनुषंगिक कामे असमाधानकारक आहे असे विद्यापीठ प्रशासनास वारंवार आढळून आल्यास या बाबतीत काही वाद निर्माण झाल्यास रीतसर नोटीस देऊन सर्व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून कंत्राट रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास असेल आणि या बाबत विद्यापीठाच्या कुलसचिवांचा निर्णय अंतिम राहिल. |
| २) | कामाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी काम सोडून दिल्यास व नंतर निविदा मागवून आलेला दर चालू कंत्राटाच्या मंजूर दरापेक्षा जास्त आल्यास होणारी फरकाची रक्कम व विद्यापीठास आलेला खर्च काम अपूर्ण सोडणा-या कंत्राटदार यांचेकडून वसूल केला जाईल. संबंधीत कंत्राटदारास काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल. |
| ३) | कंत्राटदार यांचे मार्फत विद्यापीठाला पुरविण्यात येणा-या कोणत्याही सुरक्षा रक्षकास कुठल्याही कारणास्तव कंत्राटदार यांनी कामावरुन कमी केल्यास अथवा कुठलीही कार्यवाही केल्यास त्या सुरक्षा रक्षकास विद्यापीठाकडे दाद मागता येणार नाही. सुरक्षा रक्षक नेमणूक करणे अथवा कामावरुन कमी करणे ही बाब कंत्राटदार यांच्या कार्यकक्षेत असल्याने यामुळे कंत्राटदाराने कामावरुन कमी केलेल्या कुठल्याही सुरक्षा रक्षकास विद्यापीठात कुठल्याही प्रकारचे आंदोलन व उपोषण करता येणार नाही, असे झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. |
| ४) | करार कालावंधी दरम्यान कंत्राटदाराची सेवा विद्यापीठ प्रशासनास असमाधानकारक वाटल्यास ३० दिवसाची पूर्व सूचना देऊन कंत्राटदाराशी झालेला करार रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठ प्रशासनाला असेल तसेच करार कालावधी दरम्यान काही वाद-विवाद निर्माण झाला तर ०३ महिन्या अगोदर संबंधीत कंत्राटदाराने विद्यापीठ प्रशासनास पूर्व सूचना देणे अनिवार्य राहिल. |
| ५) | कामाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी कंत्राटदाराने काम सोडून दिल्यास, नंतर नव्याने निविदा मागून घ्यावी लागल्यास आलेला दर, चालू मंजूर दरापेक्षा जास्त असल्यास अपूर्ण राहिलेला करार कालावधी संपुष्टात येईपर्यंत होणारी फरकाची रक्कम व विद्यापीठास आलेला सर्व खर्च काम अपूर्ण सोडणा-या कंत्राटदार यांच्याकडून वसूल केला जाईल तसेच काम अपूर्ण सोडल्यास संबंधित कंत्राटदार/एजन्सीला काळया यादीत समाविष्ट करण्याचा अधिकार विद्यापीठ राखून ठेवत आहे. |
| ६) | सुरक्षेच्या कामासाठी सुरक्षा रक्षक नेमणूक करणे, कामावरुन कमी करणे, कामामध्ये काही दिवसाचा खंड देणे, ही बाब कंत्राटदार/एजन्सीच्या कार्यकक्षेत राहिल. यामध्ये विद्यापीठाचा कसलाही संबंध राहणार नाही. |
| (७) | कंत्राटदार ज्या सुरक्षा रक्षकामार्फत संरक्षणाचे काम करून घेत आहेत त्यांच्या अंतर्गत काही प्रश्न उपस्थितीत झाल्यास किंवा वाद निर्माण झाल्यास त्यास विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहिल कंत्राटदाराने विद्यापीठात नेमलेले सर्व सुरक्षा रक्षक हे त्यांच्या स्वत:च्या आस्थापनेवरील सुरक्षा रक्षक असुन सदर सुरक्षा रक्षकांच्या नियुक्तीबाबत अथवा सेवा शर्तीबाबत काही वाद निर्माण झाल्यास सदर वाद केवळ त्यांच्या आप आपसातील वाद असेल या वादाचा अथवा सुरक्षा रक्षकाच्या सेवा शर्तीचा अथवा इतर कोणताही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंधांचा विद्यापीठाशी संबंध राहणार नाही. |

ई) करारनामा/कंत्राट रद्द करणेबाबत :-

| | |
|---|---|
| १) | वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास करारनामा कंत्राट रद्द करण्याचा अंतिम अधिकार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा राहिल. |
| २) | प्रचलित नियम/अधिनियमांच्या विसंगत कृती केल्यास करारनामा/कंत्राट रद्द करण्याचा अंतिम अधिकार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा राहिल. |
| ३) | कंत्राट मिळालेल्या कंत्राटदाराने समाधानकारक सेवा पुरविल्यास सध्या लागू असलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती कायम ठेवून पुन्हा विद्यापीठ ठरवेल तेवढ्या पुढील कालावधीसाठी कंत्राटाची मुदत वाढवून देण्यात |

| | |
|---|---|
| | येईल तसे कंत्राटदारावर बंधनकारक राहिल. तसेच असमाधानकारक सेवा वाटल्यास पूर्वसूचना देऊन करारनामा कत्राट रद्द करण्यात येईल. |
| ४) | कामाच्या वेळेत कंत्राटदाराचा कोणताही सुरक्षा रक्षक कोणत्याही प्रकारची नशा करताना, झोपताना, बेफीकीर वृत्तीने वागतांना, गैरवर्तणूक करतांना कामाच्या जागेवर गैरहजर राहिल्यास सोपवलेले काम न केल्यास त्या सुरक्षा रक्षकाचे देयक विद्यापीठ कंत्राटदारास अदा करणार नाही. तसेच वरील बाब ज्या व्यक्ती सदर्भात वारंवार घडेल अशा व्यक्तीस कंत्राटदाराने कामावर ठेऊ नये, या सर्व बाबींची खात्री करण्याचे अधिकार विद्यापीठ स्वत: कडे राखून ठेवत आहे, तसेच या संदर्भात वरील सर्व प्रकार वारंवार घडल्यास करारनामा/कंत्राट रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहिल. |
| ५) | करारातील कंत्राट कालावधी संपेपर्यंत कंत्राट मध्येच सोडता येणार नाही व सोडल्यास ०३ महिन्याची देयकाची रक्कम विद्यापीठास दंड स्वरुपात जमा केली जाईल. विद्यापीठाने नविन कंत्राटदार / एजन्सी नियुक्त केल्यानंतरच आपणासोबत केलेले करार संपुष्टात येईल. |

**ऊ) न्यायालयीन कार्यक्षेत्र: -**

कंत्राटदार आणि विद्यापीठ यांच्यात वरील अटी-शर्तीच्या अधीन राहून झालेला करारनाम्यातील कोणत्याही कायदेविषयक वाद उद्भवल्यास त्याकरिता भारतीय लवाद कायदा, १९९६ मधील तरतुद लागू राहतील. लवाद कार्य नांदेड राहील व विद्यापीठाचे मा.कुलगुरु महोदय लवाद असतील. लवादाची भाषा इंग्रजी अथवा मराठी असेल.

प्र.कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपूरी, नांदेड

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

## - प्रतिज्ञापत्र (नमुना) -

(रु ५००/-च्या बॉण्ड पेपरवर नोटरीसह सादर करणे आवश्यक आहे.)

मी .............................................. वय : .............वर्ष, राहणार : ..........................................
संस्थेचे नाव व पत्ता ......................................................................सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

१) मी/ आम्ही खाली सह्या करणार सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की, माझे आमचे विद्यापीठातील कोणत्याही व्यक्ती सोबत कोणत्याही प्रकारची भागीदारी /शेअर किवा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नाही.

२) मी/ आम्हास कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाने अथवा कोणत्याही खाजगी संस्थेने दिवाळखोर म्हणून जाहिर/घोषित केलेले नाही.

३) मी/ आम्ही/आमच्या संस्थेकडून कोणतेही गैर कृत्य घडल्याची नोंद इतर शासकीय/निमशासकीय कार्यालय अथवा कोणत्याही खाजगी संस्थेमध्ये नाही.

४) मी/आम्ही/संस्थेकडून कोणतेही गुन्हेगारी प्रकारचे कृत्य घडलेले नाही तसेच कोणत्याही त्याबाबत मी/आम्ही/आमच्या संस्थे विरुध्द कोणत्याही न्यायालयात दावा दाखल झालेला नाही.

५) मी/आम्ही/आमच्या संस्थेने आयकर जीएसटी व फेरा इ. कायद्याचे उल्लंघन केलेले नाही त्या बाबत माझ्या /आमच्या संस्थेच्या विरुध्द खटला किवा दावा दाखल झालेला नाही.

६) मला / आम्हाला /संस्थेला कोणत्याही शासकीय /स्थानिक संस्था किवा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने काळया यादीत टाकलेले नाही.

७) विद्यापीठास सुरक्षा रक्षक पुरविण्याच्या कामाच्या निविदेतील तपशिल/स्वरुप व त्याबाबतची व्याप्ती मध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे सुरक्षा रक्षक पुरविणेच्या सेवेचा दर्जा चांगला नसल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव कंत्राट रद्द केल्यास मी/आम्ही सदर ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविण्याच्या सेवेसाठी व इतर कामासाठी केलेल्या खर्चाची मागणी करणार नाही.

८) मी/आम्ही ई-निविदेच्या पात्रते बाबत दाखल केलेले कागदपत्र सर्व खरे व सत्य आहेत. त्यात काही फसवेगिरी आढळून आल्यास किंवा तसे करार काळात आढळून आल्यास मी आम्ही त्यासाठो जबाबदार राहू व अपात्र ठरु व मी/ आम्ही जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम परत घेण्यास अपात्र ठरु अशा परिस्थितीत विद्यापीठाने सदर रक्कम विद्यापीठाकडे जमा करणे आम्हास मान्य असून त्यासाठी आम्ही बांधलेले आहोत तसेच वरील प्रमाणे बाब लक्षात आल्यास मला/आम्हास काळ्या यादीत टाकल्यास ते मला आम्हाला मान्य राहिल.

९) भविष्यात केंद्र/राज्य सरकार यांनी कोणत्याही प्रकारचे कर लादल्यास ते सर्व कर भरण्याची जबाबदारी स्विकारत आहे.

| | |
|---|---|
| निविदाधारकाची सही | :.................................................. |
| निविदाधारकाचे/एजन्सीचे नाव | :.................................................. |
| पत्ता | :.................................................. |
| मोबाईल/दुरध्वनी क्र. | :.................................................. |
| फॅक्स क्र. | :.................................................. |
| e-mail ID | :.................................................. |

## - हमीपत्र- (नमुना)

(निविदा धारकाने Letter Head वर देणे)

प्रमाणित करण्यात येते की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी सुरक्षा रक्षक पुरविण्याच्या कंत्राटाविषयी घालून दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी /आम्ही वाचल्या असून जर मला/आम्हास हे कंत्राट मिळाल्यास विद्यापीठाने सदर निविदेत घालून दिलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता करण्याची जबाबदारी माझ्यावर/आमच्यावर असून त्या माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक राहतील.

सदर ई-निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा जर माझ्या आमच्याकडून भंग झाला तर माझी/आमची विद्यापीठाकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार विद्यापीठास राहिल तसेच त्यामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई देखील करण्यास मी/आम्ही जबाबदार असू तसेच मी/आम्ही विद्यापीठास पुरविलेल्या सुरक्षा रक्षकांकडून कंत्राटाच्या कालावधीत विद्यापीठाच्या कोणत्याही चल/अचल मालमत्तेचे नुकसान झाल्यास किंवा तसेच कंत्राटाचा कालावधी संपल्यानंतर लक्षात आल्यास तसेच शासकीय कायद्यांचे पालन न झाल्यास त्याची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी माझी/आमची राहिल.

शिक्का

निविदाधारकाची सही :..............................
निविदाधारकाचे/एजन्सीचे नाव :..............................
पत्ता :..............................
मोबाईल/दुरध्वनी क्र. :..............................
फॅक्स क्र. :..............................
e-mail ID :..............................

## - हमीपत्र- (नमुना)

(सदर हमीपत्र कंत्राट कालावधीत दर महिन्याच्या देयकासोबत जोडणे आवश्यक राहील)

मी ..........................वय :................................... राहणार संस्थेचे नांव व पत्ता......................
............................................ सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, विद्यापीठाने मला सन.............ते ..............
या ...........वर्षाकरिता सुरक्षा रक्षक पुरविण्याच्या कंत्राट दिले असून त्या करिताचे वेतन सुरक्षा रक्षकांना अदा करण्यात येते. त्या अंतर्गत हमीपत्र लिहून देतो को, मी माहे............................ करिताचे वेतन सुरक्षा रक्षकांना अदा करण्यात येते. अदा केलेले वेतन हे सध्या लागू असलेल्या किमान वेतन कायद्याच्या दरानुसार अदा केलेले आहे, असे हमीपत्र लिहून देत आहे की, किमान वेतन कायद्यांतर्गत वेतन अदायगी बाबत त्रूटी आढळून आल्यास त्याचे निवारण करण्याची संपूर्ण जबाबदारी माझी /आमची राहिल, असे मी हमीपत्र लिहून देत आहे.

शिक्का

| | |
|---|---|
| निविदाधारकाची सही | :.................................. |
| निविदाधारकाचे/एजन्सीचे नाव | :.................................. |
| पत्ता | :.................................. |
| मोबाईल/दुरध्वनी क्र. | :.................................. |
| फॅक्स क्र. | :.................................. |
| e-mail ID | :.................................. |

Validate Print Help [illegible]ise BoQ

Tender Inviting Authority: Registrar, Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

Name of Work: E-Tender No.101-2025 for Providing Services of Security Guard for 2025-26, S.R.T.M. University, Nanded

Contract No: SRTMUN/ESTABLISHMENT/Security Guard/ET-101-2025 ( Rate should be Quot in Indian Rupee Only )

| Name of the Bidder/ Bidding Firm / Company : | |
|---|---|

**PRICE SCHEDULE**

(This BOQ template must not be modified/replaced by the bidder and the same should be uploaded after filling the relevent columns, else the bidder is liable to be rejected for this tender. Bidders are allowed to enter the Bidder Name and Values only )

| NUMBER # | TEXT # | NUMBER # | TEXT # | NUMBER # | NUMBER | NUMBER | NUMBER # | NUMBER # | TEXT # |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Item Description | Estimated Quantity | Units per person per day. | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder in Rs. P | GST (Percentage) | GST Amount in Rs. P | TOTAL AMOUNT excluding taxes in Rs. P | TOTAL AMOUNT including taxes Rs. P | TOTAL AMOUNT In Words |
| 1 | 2 | 4 | 5 | 7 | 8 | 9 | 11 | 12 | 13 |
| 1 | **Providing Services of Security Guard for 2025-26, S.R.T.M. University, Nanded** | | | | | | | | |
| 1.01 | Security Guard Wages | 1.00 | Nos | | | 0.00 | 0.000 | 0.000 | INR Zero Only |
| 1.02 | Contractor Service Charge | 1.00 | Nos | | | 0.00 | 0.000 | 0.000 | INR Zero Only |
| Total in Figures | | | | | | | 0.000 | 0.000 | INR Zero Only |
| Quoted Rate in Words | | INR Zero Only | | | | | | | |

Registrar
Swami Ramanand Teerth
Marathwada University, Nanded.
(Maharashtra State) INDIA-431606